**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**
**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**
दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/उमा/गोप./3159
कोल्हापूर ४१६००४
दिनांक :-०६/०२/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व कनिष्ठ महाविद्यालये
सातारा, सांगली, कोल्हापूर

**विषय :- इयत्ता १२ वी विषयाच्या शिक्षक, परीक्षक व नियामक यांच्या कार्यशाळेस उपस्थित राहणेबाबत.....**

वरील विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर आणि कनिष्ठ महाविद्यालयीन इंग्लीश टिचर्स असोशिएशन, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील इंग्रजी विषयाच्या शिक्षकांचे तसेच परीक्षक व नियामक यांची एक दिवसीय कार्यशाळा खालील वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येणार आहे.

सदर कार्यशाळेमध्ये उत्तरपत्रिका मूल्यमापनातील चूकांचे प्रमाण नगण्य व्हावे, योग्य पद्धतीने मूल्यमापन व्हावे याबाबत अनुभवी तज्ञ शिक्षकांकडून मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच इंग्रजी विषयाच्या अध्यापन व अध्ययना वेळी येणा-या अडचणी, समस्या व त्यावरील उपाय याबाबत चर्चासत्र आयोजित करण्यात येणार आहे. सबब आपणास सूचित करण्यात येते की, खाली नमूद वेळापत्रकाप्रमाणे आपल्या उच्च माध्यमिक शाळेतील/कनिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी विषयाच्या शिक्षकांना सदर कार्यशाळेस उपस्थित राहण्यासाठी कार्यमुक्त करण्यात यावे. उपस्थितीचा दिवस हा कर्तव्य कालावधी समजण्यात यावा.

कार्यशाळेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| जिल्हा | वार व दिनांक | ठिकाण | वेळ |
|---|---|---|---|
| कोल्हापूर | गुरुवार दिनांक १५.०२.२०२४ | मेन राजाराम हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज, भवानी मंडप, कोल्हापूर | सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत |
| सांगली | शुक्रवार दिनांक १६.०२.२०२४ | डॉ.पतंगराव कदम कॉलेज, सांगलीवाडी, सांगली | सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत |
| सातारा | शनिवार दिनांक १७.०२.२०२४ | डी.पी. भोसले कॉलेज, कोरेगांव, जि.सातारा | सकाळी १०.०० ते सायंकाळी ०५.०० पर्यंत |

तरी आपल्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील इंग्रजी विषयाच्या शिक्षकांना सदर कार्यशाळेस वरील जिल्हानिहाय कार्यशाळेच्या सोयीच्या ठिकाणी विहीत दिनांकास व वेळेत उपस्थित राहणेबाबत आपल्या स्तरावरुन आदेश देण्यात यावे.

**(सुभाष रा.चौगुले),**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**

**प्रत माहितीसाठी :-**
सर्व इंग्रजी शिक्षक,
श्री./श्रीमती - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - तज्ञ मार्गदर्शक/कार्यशाळा संयोजक.